# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक १९.०३.२०२३ रविवार**

**प्रसिध्दीपत्रक**

पोलीस आयुक्तालय नागपूर शहर, यांचे आस्थापनेवरील पोलीस भर्ती मधील पोलीस शिपाई चालक यांची एकुण १२१ पदे भरण्यासाठी कार्यालयाने दिनांक. ०५.११.२०२२ अन्वये जाहीरात प्रसिध्दी केली होती. सदर पदासाठी लेखी परिक्षा आता दिनांक. २६.०३.२०२३ रोजी पोलीस मुख्यालय नागपूर शहर येथे आयोजीत करण्यात आलेली आहे.

तरी उमेदवारांनी कृपया याबाबत नोंद घेवुन पोलीस शिपाई चालक या परिक्षेचे लेखी परिक्षा प्रवेशपत्र https ://policerecruitment2022.mahait.org या संकेतस्थळावरून डाउनलोड करून घ्यावेत.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी : — जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक**

दिनांक १८.०३.२०२३ चे २२.३० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, बी.बी. कॉलोनीचे मागे, भुषण नगर, नविन कामठी येथे किरायाने राहणारे फिर्यादी मोहसिन खान वल्द जीमल खान वय ३७ वर्ष, यांचा मुलगा तसलिम खान यांनी आरोपी क्र. १) शुभम मुकेश चौधरी वय २० वर्ष रा. सिटी बंगला न. ९७ येरखेडा कामठी यांचे जवळुन सहा महीन्यापुर्वी कामा करीता १,५०,०००/—रू उधार घेतले होते. त्यापैकी फिर्यादीचे मुलाने ८५,०००/— रू शुभमला परत केले होते. उर्वरीत रक्कम व व्याज देणे बाकी होते याच कारणावरून आरोपी क्र. १ व २) उमैरूद्दीन वल्द फैजुद्दीन अंसारी वय ३१ वर्ष,(दाढीवाला) रा. अंगुलीमाल बौध्द विहारा जवळ, कामगार नगर, कामठी ३) सैय्यद अली वल्द मोहम्मद अली वय ३३ वर्ष, रा. स्माईलपूरा, नयागोदाम, माता मंदीर जवळ कामठी, व त्याचे साथिदार यांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून चाकुने पोटावर मारून गंभीर जख्मी केले. जख्मीचा उपचार सिटी हॉस्पीटल कामठी, येथे सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि मोतींगे ९३५९२१५०१६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०७, ५०४, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी क्र १ ते ३. यांना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे पारडी :— विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक**

दिनांक १७.०३.२०२३ चे १७.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, राहणारी २७ वर्षीय फिर्यादी, ही आरोपी वसिम गफ्फार शेख वय ३८ वर्ष, रा. प्लॉट न. ५८, दुर्गा नगर, पारडी, नागपूर यांना ओळखत असुन आरोपीने फिर्यादीस लग्ना बाबत विचारले असता, फिर्यादीने आरोपी सोबत बोलने बंद केले याच कारणावरून आरोपीने फिर्यादीचे घरा समोर जावुन फिर्यादीचे आई सोबत अश्लिल शिवीगाळ करून फिर्यादी सोबत तिचे मनास लज्जा येईल असे कृत्य करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे पारडी येथे सपोनि काळे ७०२१४०९५०० यांनी आरोपी विरूध्द कलम ३५४, २९४, ३२३, ५०६(ब) भादवि, अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीस अटक करून तपास सुरू आहे.

## ( अकस्मात मृत्यु )

**१) पोलीस ठाणे पारडी** : — दिनांक १८.०३.२०२३ चे १७.४१ वा चे पुर्वी पो.ठाणे पारडी हद्दीत जय अंबे नगर, पारडी येथे राहणारे अशोक गंगाधर वरूडकर वय ५३ वर्ष यांनी आपले राहते घरी अज्ञात कारणावरून घराचे लाकडी बल्लीली निळया रंगाचे कपडयाने गळफास घेवुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी ज्ञानेश्वर अशोक वरूडकर वय २८ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि आहेर ८०५५५२५३०१ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे.

**२) पोलीस ठाणे कोतवाली** : — दिनांक १६.०३.२०२३ चे रात्री ०२.३० वा चे सुमारास पो.ठाणे कोतवाली हद्दीत प्लॉट न. ३९/ए, नेहरू पार्क शिव नगर, कोतवाली येथे राहणारे नंदकिशोर श्यामराव पायतोडे वय ६८ वर्ष, यांची पत्नी सन २०२२ मध्ये मरण पावल्याने ते नेहमी मानसिक तनावात राहत होते त्यांनी राहते घरी कोणतेतरी विषारी औषधचे प्राशन केल्याने त्यांची प्रकृति खराब झाल्याने त्यांना उपचारकामी आनंदम हॉस्पीटल श्रीकृष्ण नगर येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान दि. १८.०३.२०२३ चे १४.१५ वा चे दरम्यान डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी योगेश नंदकिशोर पायतोडे वय ३७ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे पोउपनि कुहीकर ९८९०१३०७३९ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली आहे.

**(अंकुश राठोड)**
पोलीस उप निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर.

## वाहतुक शाखेची अधिसुचना

दिनांक २१.०३.२०२३ ते २३.०३.२०२३ पावेतो नागपूर शहर येथे G-20 परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या दरम्यान मान्यवर हे नागपूर शहरात विवीध ठिकाणी भेटी देणार आहे. मान्यवरांचे कार्यक्रम दरम्यान नागपूर शहरात महत्वाचे ठिकाणी वाहतूक पोलीसांकडुन तसेच विवीध ठिकाणी बॅरीकेडींग करून वाहतूक तात्पूरती थांबविण्याची/वळविण्याची आवश्यकता आहे. याकरिता अधिसूचना प्रसारित करण्यात आलेली आहे.

**दिनांक १९.०३.२०२३ ते २२.०३.२०२३ रोजी पावेतो मान्यवरांचे नागपूर शहरात विवीध ठिकाणी कार्यक्रम आयोजित आहेत. मान्यवरांचे कार्यक्रम तसेच मार्गक्रमण दरम्यान आवश्यकतेनुसार वाहतूक थांबविण्यात/वळविण्यात येणार आहे. तरी या दरम्यान वाहन चालकांनी आवश्यक त्या मार्गाचा वापर करावा.**

**मान्यवरांचे बंदोबस्त कर्तव्यावरील अधिकारी/अंमलदार यांना आवश्यकतेनूसार वाहतूक वळविण्याचे व थांबविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.**

**सदर अधिसूचना हि दिनांक १९.०३.२०२३ ते २२.०३.२०२३ रोजी पर्यंत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या आव्हानाचे पालन करून आपली होणारी गैरसोय व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—
( चेतना तिडके )
पोलीस उप आयुक्त, वाहतुक,
नागपूर शहर.